▶ सर्वसामान्य कष्टकरी जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रतिज्ञाबध्द असलेले शासन मान्यताप्राप्त मराठी साप्ताहिक ▶

साप्ताहिक (स्थापना : १९ जानेवारी २००८) शासकीय जाहिरात यादीवरील साप्ताहिक

# पहाटवारा


R.N.I. No. MAHMAR/2008/22960

वाशिम । खंड १८ । वर्ष १८ । अंक १८ । शनिवार दि. १८ ते २५ मे २०२४ । पृष्ठे ४ । किंमत १ रुपया

**Website :**
pahatwara.page
pahatwara.com

**Postal Regd. No.**
Akola DN./045/2023-2025

**EMAIL ID**
adityanewsnetwork@gmail.com
weeklypahatwara@gmail.com
pahatwarawsm@gmail.com



श्रध्दास्थान मुनीश्री तरुणसागरजी महाराज



श्रध्दास्थान मुनीश्री विद्यासागरजी महाराज

संपादक : संदीप ओंकारआप्पा पिंपळकर Mob. 9822047068, 8275220012 ▶ सहसंपादक : रणजितसिंह ठाकुर 8483883416

■ परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक

# शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी एसटीची १८०० २२१ २५१ हेल्पलाईन सुरु

**मुंबई, दि. २६ : शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी – विद्यार्थिनींना घरातून शाळेला जाताना अथवा शाळेतून घरी येताना एसटी प्रवासात काही अडचण आल्यास अथवा एसटी बसेस वेळेवर न आल्यास, अचानक रद्द करण्यात आल्यास त्यांना योग्य ती मदत मिळावी, यासाठी एसटी महामंडळाची १८०० २२१ २५१ या क्रमांकाची हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.**

राज्यभरातील लाखो विद्यार्थी - विद्यार्थिनींना शाळेत जाण्यासाठी व तेथून घरी येण्यासाठी एसटी महामंडळ बस फेऱ्या उपलब्ध करून देत असते. राज्य शासन एसटीच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना घरातून शाळेला जा - ये करण्यासाठी मासिक पासमध्ये ६६.६६ टक्के सवलत दिली जाते. तसेच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेंतर्गत बारावीपर्यंतच्या मुलींना मोफत मासिक पास दिला जातो.

मंत्री श्री.सरनाईक यांनी धाराशिव मध्यवर्ती बसस्थानकाला भेट दिली असता, तेथे उपस्थित असणाऱ्या शालेय विद्यार्थी- विद्यार्थिनींनी अनेक समस्या व तक्रारी त्यांच्यासमोर मांडल्या. अनेक शालेय बसेस वेळेवर न सुटणे, गर्दी असल्यामुळे थांब्यावर न थांबणे, बसेस उशिरा येणे अथवा अचानक रद्द होणे यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार काही विद्यार्थ्यांनी केली. संध्याकाळच्या वेळी शाळा -महाविद्यालय सुटल्यानंतर किमान एक तासात मुले आपल्या घरी जाणे अपेक्षित असते. परंतु, बसेस वेळेवर न आल्याने अथवा अचानक रद्द झाल्याने मुलांना घरी पोहोचण्यास खूप उशीर होतो. शालेय विद्यार्थी -विद्यार्थिनींना घरुन शाळेत जात असताना अथवा शाळेतून घरी येत असताना बसेस उशिरा सुटणे, त्या अचानक रद्द होणे, तांत्रिक बिघाडामुळे बस नादूरूस्त झाल्याने घरी पोहोचण्यास अडचण निर्माण झाल्यास त्यांनी तातडीने एसटीच्या हेल्पलाइन क्रमांक वर संपर्क करून मदत मिळावी, या हेतूने १८०० २२१ २५१ हा हेल्पलाइन क्रमांक सुरू करण्यात आलेला आहे. या क्रमांकावर विद्यार्थी ह्न विद्यार्थिनींनी संपर्क साधावा, जेणेकरून त्यांना तातडीने मदत उपलब्ध करून देता येईल, त्याचबरोबर, संबंधित शाळा, महाविद्यालयांना ३१ विभागातील सर्व विभाग नियंत्रकांचे दुरध्वनी संपर्क क्रमांक देण्यात येत आहेत, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीमध्ये शाळा महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक तसेच थेट विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी देखील या विभाग नियंत्रकांना संपर्क करून आपल्या समस्या मांडू शकतात. एसटी बसेस उशिरा सुटणे, अचानक रद्द होणे अथवा अन्य कारणामुळे शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींचे तास चुकतात किंवा परीक्षेला ते वेळेवर पोहोचू शकत नाहीत, काही वेळेला त्यांची महत्त्वाची परीक्षा देऊशकत नाहीत. विद्यार्थ्यांच्या अशा शालेय नुकसानीला संबंधित क्षेत्रातील आगार व्यवस्थापक व त्यांचे पर्यवेक्षक यांना जबाबदार धरण्यात येईल. त्याचप्रमाणे, सोमवार ते शुक्रवार संध्याकाळी ५-६ या वेळेत मुख्य बसस्थानक व ज्या ठिकाणी विद्यार्थी चढ-उतार जास्त होते, अशा थांब्यावर संबंधित आगाराच्या पर्यवेक्षकांनी गणवेशात थांबून वाहतुकीचे नियोजन करावे. शाळेचा शेवटचा मुलगा अथवा मुलगी बसने सुखरूप घरी जाईपर्यंत संबंधित पर्यवेक्षकांनी तेथून हलू नये, अशा स्पष्ट सूचना मंत्री श्री.सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिलेल्या आहेत. शालेय बस फेऱ्यांच्या गैरव्यवस्थापनामूळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याची लेखी तक्रार संबंधित विद्यार्थी अथवा विद्यार्थिनींनी तसेच संबंधित शाळा - महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांनी केल्यास जितक्या दिवसाचे शालेय नुकसान होईल, तितके दिवस यास जबाबदार असणारे पर्यवेक्षक अथवा अधिकाऱ्यांना निलंबित अथवा सक्तीच्या रजेवर पाठवण्यात यावे, असे निर्देशही परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या महाव्यवस्थापक (वाहतूक) यांना दिले आहेत.

## महाराष्ट्र महत्वाचे

### शिष्यवृत्ती परीक्षा आता २२ फेब्रुवारीला

मुंबई, दि. २६ : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ च्या तारखेत बदल करण्यात आला आहे.

आता ही परीक्षा ८ फेब्रुवारी २०२६ ऐवजी २२ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्यभर एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) तर्फे केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) देखील ८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. राज्यातील अनेक प्राथमिक व माध्यमिक शिक्षक सीटीईटी परीक्षेला बसणार असल्याने त्यांच्याकडून शिष्यवृत्ती परीक्षेची तारीख बदलण्याची मागणी करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर परिषदेने शिष्यवृत्ती परीक्षेचा दिवस बदलत नवीन तारीख २२ फेब्रुवारी २०२६ जाहीर केली आहे. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी, पालकांनी, शाळांनी व परीक्षा केंरद्रांनी या बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

### मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर

वाशिम, (जिमाका) राज्य शासनाने नगर परिषदा व नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने मंगळवार, दि. २ डिसेंबर २०२५ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे.

ही सुट्टी वाशिम जिल्ह्यातील, रिसोड, कारंजा, मंगरूळपीर नगर परिषद व मालेगाव नगर पंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित मतदार संघात लागू राहील. ही अधिसूचना दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी जारी करण्यात आली आहे.

निर्वाचन प्रक्रिया सुरळीत पार पडावी, तसेच मतदारांनी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सोयीस्कर वातावरण निर्माण व्हावे, यासाठी शासनाने ही सुट्टी लागू केली आहे. ही सार्वजनिक सुट्टी संबंधित मतदारसंघातील कामानिमित्त बाहेर असणाऱ्या मतदारांना देखील लागू राहील.
तसेच या अधिसूचनेनुसार वरील नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्रातील केंद्र शासनाची कार्यालये, राज्य शासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका, वित्तीय संस्था इत्यादींनाही ही सुट्टी लागू राहील, असे अधिसूचनेत नमूद आहे.

### निवडणुक आचार संहितेमुळे डिसेंबर महिन्यातील लोकशाही दिन होणार नाही

वाशिम, दि. ३० नोव्हेंबर (जिमाका) स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीची आचार संहिता ३ डिसेंबर पर्यंत असल्याने माहे डिसेंबर २०२५ या महिन्यातील जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जाणार नाही, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी दिली आहे.

## बीज भांडवल योजनेसाठी अर्ज करण्याचे दिव्यांग व्यक्तींना आवाहन

**मुंबई दि.२७ : दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या बीज भांडवल योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, मुंबई उपनगर यांनी केले आहे.**

या योजनेअंतर्गत लाभ मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज विहीत नमुन्यात दोन प्रतीत सादर करावा लागणार आहे. अर्जासोबत दिव्यांगत्वाचा दाखला, दोन पासपोर्ट साईज फोटो, जन्मतारखेचा दाखला किंवा वयाचा दाखला उत्पन्नाचा दाखला एक लाखापर्यंत तहसीलदार यांचेकडून, रहिवासी दाखला किंवा जागेचे प्रमाणपत्र रेशनकार्ड. दोन प्रतिष्ठीत व्यक्तीचे दाखले (नगरसेवक/संरपंच/ग्रामसेवक/एस.ई. ओ. यांचेकडून) संबंधित व्यवसायाचे खरेदी कोटेशन १ लाख ५० हजार पर्यंत, राष्ट्रीयकृत बँकेचे नांव व शाखा, व्यवसायाचे प्रोजेक्ट रिपोर्ट (सी. ए. कडील) ज्या जागेमध्ये व्यवसाय करणार आहे. त्या जागेची बृहन्मुंबई महानगरपालिका वॉर्ड ऑफिसमधील नोंद कागदपत्रे/संमतीपत्र/भाडे प्रमाणपत्र, शॉप ॲक्ट लायन्सेस इत्यादी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. इच्छुक दिव्यांग व्यक्तींनी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, मुंबई उपनगर, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, आर.सी. मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई ह्न ७१ येथे संपर्क साधावा. योजनांचे अर्ज कार्यालयात उपलब्ध असल्याचेही मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांनी प्रसीद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## पुरुष नसबंदी पंधरवड्यानिमित्त जिल्हा रुग्णालयात नसबंदी शस्त्रक्रिया आयोजित

वाशिम,दि. २८ नोव्हेंबर (जिमाका) ४ डिसेंबर पर्यंत राबविण्यात येणाऱ्या पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा अभियानांतर्गत आज जिल्हा रुग्णालय, वाशिम येथे पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आली.

ही शस्त्रक्रिया जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.पी.एस. ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. शस्त्रक्रिया करणारे प्रमुख सर्जन डॉ. अविनाश झरे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. पराग राठोड, तसेच आरोग्य निरीक्षक नितीन व्यवहारे, आरोग्य सेवक ध्रुवल मोरे, समाधान इंगोले आणि जिल्हा रुग्णालयातील इतर आरोग्य कर्मचाऱ्यांनी शस्त्रक्रिया प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविला.

अधिकाधिक लाभार्थ्यांनी पुरुष नसबंदीची निवड करावी आणि कुटुंब नियोजनाबाबत जागरूकता वाढविण्यासाठी आरोग्य यंत्रणेने विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.पी.एस. ठोंबरे यांनी दिल्या. पुरुष नसबंदी सुरक्षित, सोपी व प्रभावी पद्धत असून या पंधरवड्यात अधिकाधिक पुरुषांनी या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाने केले आहे.

## 'महा-देवा फुटबॉल उपक्रम' अंतर्गत निवडक ६० विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार - क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे

मुंबई दि.२७ : राज्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील फुटबॉलमधील प्रतिभेला व्यासपीठ देण्यासाठी महादेवा फुटबॉल उपक्रम अंतर्गत निवड झालेल्या ६० मुला-मुलींना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा व युवक कल्याण विभाग, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा),वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (डब्ल्यूआयएफए) आणि व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाऊंडेशन (व्हीएसटीएफ) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला असल्याची माहिती क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिली. या उपक्रमांतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना तज्ज्ञ प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा, फिटनेस मॉड्यूल तसेच राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील मोठ्या स्पर्धांमध्ये सहभागी होण्याच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्यातील प्रत्येक खेळाडूला योग्य संधी, सक्षम मार्गदर्शन आणि दर्जेदार सुविधा देण्यात येणार असल्याचे क्रीडामंत्री कोकाटे यांनी सांगितले.

सुविचार : जो आपण न मागता प्राप्त करतो, प्रेमाने मिळवतो आणि समोरच्याला अतिशय सन्मानाने देतो, तोच आदर होय. – फिलिप जेम्स बेली

## वृद्धांचे सामाजीक पुनर्वसन करणे गरजेचे

भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेत वृद्धांना आदर, संरक्षण आणि कुटुंबीय जबाबदारीचे स्थान दिले गेले आहे. वृद्धांविरुद्ध नोंदलेल्या गुन्ह्यांमध्ये सर्वाधिक प्रमाण 'साधे दुखापत' किंवा शारीरिक अत्याचारांचे आहे, परंतु त्याचवेळी चोरी, ठगी/बनावट/फसवणूक आणि आर्थिक शोषण या आर्थिक स्वरूपाच्या गुन्ह्यांनी मोठ्या प्रमाणावर वृद्धांना लक्ष्य केले आहे, हे विशेषतः महत्त्वाचे आहे. कारण आर्थिक शोषण हे वृद्धांची आत्मनिर्भरता आणि मानसिक स्वास्थ्य यांना परावृत्त करते व सामाजिक पुनर्वसन ही कठीण करते. महानगरांमध्येही वृद्धांविरुद्धचे गुन्हे महत्त्वाचे आहेत; दिल्ली, बंगळूरु आणि मुंबई यांसारख्या शहरांमध्ये वृद्धांविरुद्ध नोंदवलेली प्रकरणे वारंवार उच्च आढळतात व मोठ्या शहरांतील विभक्त कुटुंबसंरचना, सामाजिक अलगापन व सार्वजनिक ठिकाणी असलेली असुरक्षितता यांचा वृद्धांच्या अतीव संवेदनशीलतेशी सुसंगत संबंध आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने ह्या समस्येचे मूळ अनेक स्तरांवर आहे. पहिले आणि सर्वात थेट कारण म्हणजे कुटुंबरचना आणि पिढीगत बदल-पारंपरिक संयुक्त कुटुंबापासून विभक्त आणि एकल-व्यक्ती कुटुंबाकडे गेलेली बदलती प्रवृत्ती वृद्धांना वैयक्तिक तसेच सामाजिक आधारापासून वंचित करते; ज्यामुळे अनेक वृद्ध एकटेपणाचा अनुभव घेतात, नियमित सामाजिक निरीक्षण कमी होत म्हणून शारीरिक आणि आर्थिक शोषणाचे धोके वाढतात. दुसरे कारण, आर्थिक असुरक्षितता-अनेक ज्येष्ठ नागरिकांचे उत्पन्न मर्यादित पेन्शन, बचत वा कौटुंबिक अवलंबित्वावर अवलंबून असते; अशा आर्थिक निर्भरतेमुळे ते नातेवाइकांद्वारे होणाऱ्या दडपणाचे आणि मालमत्तेवरील दबावाचे लक्ष्य बनतात. तिसरे कारण, सामाजिक प्रतिष्ठेच्या अभावामुळे वृद्धांचे स्थान कमी झाले आहे; कामावरून निवृत्त झालेल्या व्यक्तींना कुटुंबात व समुदायात कमी महत्त्व दिले जाणे, त्यांची मते दुर्लक्षित होणे आणि निर्णय प्रक्रियेपासून त्यांना वगळणे ह्या सर्वांचा मानसिक व सामाजिक परिणाम गंभीर स्वरूपाचा असतो. चौथे कारण, तंत्रज्ञान आणि डिजिटलीकरणामुळे निर्माण झालेले नवीन प्रकारचे धोके-ऑनलाइन बँकिंग, मोबाइल पेमेंट्स, ओटीपी व कॉल स्कॅम्स यांनी वृद्धांना आर्थिक फसवणुकीसाठी अतिशय संवेदनशील केले आहे; त्यांची डिजिटल साक्षरतेची कमतरता आणि अगदी विश्वसनीय वाटणाऱ्या प्लॅटफॉर्म्सचा गैरवापर या प्रक्रियेला चालना देतो. पाचवे आणि अत्यंत निर्णायक कारण म्हणजे न्यायप्रणाली आणि अंमलबजावणीच्या प्रक्रियेत असलेली कमकुवतता आर्थिक स्वरूपाचे गुन्हे ठगी, बनावट व्यवहार, फसवणूक आणि किंग-आधारित ठगी यांची वाढ ही काळजीची बाब आहे कारण ती वृद्धांच्या आर्थिक सुरक्षिततेवर थेट हल्ला करते. एनसीआरबी आणि माध्यमिक अहवालातील आकडे दाखवतात की महानगरांमधील आणि काही राज्यांमधील तज्ज्ञ प्रकारात फसवणूक आणि बनावट व्यवहार मोठ्या प्रमाणात नोंदले गेले आहेत; अनेकदा पेन्शन खाते, बँक डिटेल्स, ओटीपी किंवा विश्वासार्ह वाटणाऱ्या कॉल्सद्वारे पैसे हस्तांतरित करण्याची सवय वापरून अनेक वृद्ध मोठ्या आर्थिक नुकसानाला सामोरे गेले. या प्रकारच्या गुन्ह्यांचा परिणाम तत्कालीन वित्तीय नुकसानांव्यतिरिक्त दीर्घकालीन मानसिक ताण, सामाजिक शत्रुता व आत्मसन्मान घट असतो. काही प्रकरणांमध्ये कोणत्याही आर्थिक मदतीला पुनरागमन कठीण ठरते आणि वृद्धांचे जीवनमान लक्षणीयरीत्या खालावते. शारीरिक अत्याचार आणि घरगुती हिंसाचाराचे स्वरूपही व्यापक आहे; अहवालात 'साधे दुखापत' या श्रेणीतील प्रकरणांची उच्च संख्या दाखवली गेली असून, घरातील कलह, पैशांसाठीचे वाद, वारसाहक्काचे तंटे किंवा जीवनसाथी/कुटुंबातील सदस्यांद्वारे होत असलेले दुर्व्यवहार ही कारणे अनेकदा समोर येतात. विशेषतः जिथे वृद्धांची आरोग्यदृष्टीने निर्भरता जास्त असते आणि सामाजिक-पारंपरिक आधार कमी झालेला असतो, तिथे घरगुती हिंसा आणि परित्यागाचे प्रकार वाढतात.

# शैक्षणिक गुणवत्ता, स्वच्छता आणि शिक्षकांचे प्रयत्न वाखाणण्याजोगे - जिल्हाधिकारी कुंभेजकर

## ■ साखरा जि.प. उच्च प्राथमिक शाळेला जिल्हाधिकाऱ्यांची सदिच्छा भेट

**वाशिम ,दि.२५ नोव्हेंबर (जिमाका) गुणवत्तापूर्ण शिक्षण ही ग्रामीण विकासाची खरी पायाभरणी आहे. शाळेतील शिक्षकांनी घेतलेली मेहनत आणि विद्यार्थ्यांची जिज्ञासा पाहता ही शाळा निश्चितच जिल्ह्यासाठी आदर्श आहे. हे आज या शाळेत भेट घेतांना मला जाणवले असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.**



पुढे बोलतांना जिल्हाधिकारी म्हणाले,विद्यार्थ्यांनी रोज वाचनाची सवय लावणे अत्यंत आवश्यक आहे. वाचन ही केवळ सवय नसून व्यक्तिमत्त्व घडविणारी शक्ती आहे. प्रत्येक मुलाने पुस्तकांशी मैत्री केली पाहिजे. भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, साखरा येथे आज जिल्हाधिकारी श्री .कुंभेजकर यांनी प्रत्यक्ष भेट देत शैक्षणिक, प्रशासकीय आणि भौतिक सुविधांची सर्वांगीण पाहणी केली. यावेळी ते बोलत होते. शाळेतील वर्गव्यवस्था, अध्यापन पद्धती, विद्यार्थी गुणवत्ता तसेच परिसरातील स्वच्छता आणि सौंदर्यीकरण याबद्दल त्यांनी विशेष समाधान व्यक्त केले.

परीक्षणादरम्यान जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती जाणून घेतली आणि शिक्षकांकडून अध्यापनातील नवकल्पना व उपक्रमांची माहिती घेतली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी निरंतर वाचनाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले की ,विद्यार्थी वृत्तपत्रे, संदर्भग्रंथ, विविध लेखकांची पुस्तके नियमित वाचतील याकडे विशेष लक्ष द्यावे. वाचनाद्वारे विचारक्षमता, भाषिक कौशल्य आणि आत्मविश्वास वाढीस लागतो, असे त्यांनी सांगितले. पुढे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, गुणवत्ता वृद्धीसाठी शिक्षकांनी घेतलेले प्रयत्न, उपक्रमशीलता आणि विद्यार्थ्यांना घडविण्यासाठीची निष्ठा पाहून जिल्हाधिकाऱ्यांनी शिक्षकांचे मनापासून कौतुक केले. गुणवत्तापूर्ण शिक्षण हीच खरी बदलाची गुरुकिल्ली असून या शाळेत ते कार्य सातत्याने आणि प्रभावीपणे राबविले जात आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

यादरम्यान जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाने आणि उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी संपूर्ण शैक्षणिक प्रक्रिया, विद्यार्थ्यांची उपस्थिती, उपक्रम राबविण्याची पद्धत, संसाधनांचा वापर आणि प्रशासनिक नोंदींची तपासणी केली. शाळेच्या टीमवर्कचे कौतुक करत, भावी कामकाजासाठी आवश्यक त्या सर्व प्रकारच्या मदतीचे आश्वासन त्यांनी दिले.

शाळेच्या एकूण प्रगतीबाबत समाधान व्यक्त करत जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी पुढील वाटचालीसाठी शिक्षक व विद्यार्थ्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील शाळांनी उभारलेला गुणवत्ता विकासाचा आदर्श इतरांसाठी प्रेरणादायी आहे, असेही ते म्हणाले. साखरा विद्यालयात जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीमुळे शिक्षक-विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून शाळेच्या शैक्षणिक कार्यात नवे बळ संचारल्याची भावना सर्वांमध्ये उमटली. यावेळी मुख्याध्यापकांसह शाळेतील सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## मॅट्रीकोत्तर शिक्षणासाठी सुवर्णसंधी : महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती अर्जांना सुरुवात

वाशिम ,दि.२५ नोव्हेंबर (जिमाका) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,अकोला यांच्या अधिपत्याखाली येणाऱ्या अकोला, वाशिम व बुलडाणा या तीन जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, अनुदानित तसेच कायम विना-अनुदानित मान्यता प्राप्त महाविद्यालयांतील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना व अन्य शिष्यवृत्ती योजनांसाठीचे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी महाडीबीटी पोर्टल कार्यान्वित झाले आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्राकरिता नवीन व नुतनीकरणाच्या अर्जांची नोंदणी https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर विहित मुदतीत करणे आवश्यक आहे. या योजनेंतर्गत शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क तसेच विविध शिष्यवृत्ती लाभ मिळणार आहेत. ११ वी, १२ वी, बीए., बी कॉम., बी.एस.सी., एम ए., एम कॉम., एम एससी., बीएसडब्लू, एमएसडब्लु, बिलीब., एमलीब., एएनएम, जीएनएम, डीएड., बिएड., एमएड तसेच उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, कृषि, पशुधन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत मान्यता प्राप्त अभ्यासक्रमांना प्रवेशित असलेले अनुसूचित जमातीचे विद्यार्थी या योजनेस पात्र आहेत.

आवश्यक कागदपत्रांची यादी : अर्ज करताना विद्यार्थ्यांकडे खालील कागदपत्रे असणे बंधनकारक आहे. १. बोनाफाईड प्रमाणपत्र २. जातीचा दाखला ३. उत्पन्न प्रमाणपत्र ४. महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र ५. स्थलांतर प्रमाणपत्र (ढ.उ.) ६. शैक्षणिक गुणपत्रिका ७. संबंधित अभ्यासक्रमासाठी जात वैधता प्रमाणपत्र अधिक माहिती कुठे मिळेल? योजनेची कार्यप्रणाली, अटी व आवश्यक सूचना जाणून घेण्यासाठी शासनाच्या संकेतस्थळावरील आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय दि. १७ जानेवारी २०२२ पाहावा. महाडीबीटी पोर्टलवर शासनाकडून वेळोवेळी जारी केल्या जाणाऱ्या सूचना व मुदती विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक राहतील. अनुसूचित जमातीतील सर्व मॅट्रीकोत्तर विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घ्यावा, असे प्रकल्प अधिकारी मोहनकुमार व्यवहारे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

# अन्न सुरक्षा व मानके अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी - अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील

## जिल्हास्तरीय समिती आढावा बैठक

वाशिम, दि.२६ नोव्हेंबर (जिमाका) जिल्ह्यातील नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ ची प्रभावी अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. अन्न सुरक्षा तपासणी, भेसळ प्रतिबंधक कारवाया व परवाना व्यवस्थेची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त भाऊराव चव्हाण, गृह शाखेचे पोलीस उपअधीक्षक डी. एस. सोनवणे, कृषी उपसंचालक हिना शेख, सहाय्यक पुरवठा अधिकारी भारती सोनटक्के, जिल्हा उद्योग केंद्राचे जनरल मॅनेजर के. पी. तेलमोरे, जिल्हा अन्न विश्लेषक जी. बी. वडुळे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विजय काळे आदी उपस्थित होते. अन्न नमुने व तपासणीची कार्यपद्धती उद्दिष्टानुसार व नियोजित वेगाने पार पाडावी, असे स्पष्ट निर्देशही श्री. पाटील यांनी यावेळी दिले.तपासणी मोहिमा वाढवून अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यावर त्यांनी भर दिला. अपर जिल्हाधिकारी पाटील पुढे बोलतांना म्हणाले, अन्न पदार्थांमध्ये भेसळ, कालबाह्य उत्पादने, चुकीचे लेबलिंग किंवा स्वच्छतेचे उल्लंघन कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही. बाजारपेठा, हॉटेल्स, डेअरी, बेकरी, किराणा दुकाने तसेच शाळा परिसरातील खाद्यपदार्थांची नियमित तपासणी करावी आणि दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी. जुलै २०२५ ते सप्टेंबर २०२५ या ३ महिन्यांमध्ये अन्न व औषध प्रशासनाने एकूण १९ अन्न नमुने घेऊन विश्लेषणात्मक चाचणीसाठी पाठविले, तसेच १५ सर्विलन्स नमुने घेण्यात आले व १२ अन्नस्थापनांच्या तपासण्या करण्यात आल्या.अशी माहिती सहाय्यक आयुक्त (अन्न) भाऊराव चव्हाण यांनी बैठकीत दिली.

त्यापैकी ७ अहवाल प्राप्त झाले असून उर्वरित अहवाल लवकर प्राप्त करण्यासाठी वेळोवेळी पाठपुरावा सुरू आहे.असेही चव्हाण यांनी सांगितले. प्रतिबंधित खाद्य पदार्थ व भेसळीत मालाच्या कारवाया अधिक प्रभावीपणे राबवाव्यात, असे निर्देश श्री. पाटील यांनी दिले.

३१ मार्च २०२५ पर्यंत लक्ष्यपूर्तीचे निर्देश अन्न सुरक्षा परवाना व नोंदणी संबंधीचे निर्धारित लक्ष्य ३१ मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. कोणीही याबाबतीत अतिरिक्त शुल्क आकारू नये, याची अन्न व औषध प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी असेही यावेळी श्री.पाटील यांनी सांगितले. जनजागृतीची अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी कृषी व आरोग्य विभागाच्या प्रतिनिधींचा आयोजित कार्यशाळांमध्ये समावेश करावा, असा महत्त्वपूर्ण प्रस्ताव समिती सदस्यांनी बैठकीत मांडला.

पहाटवारा (मराठी साप्ताहिक ) ● RNI No. MAHMAR/2008/22960
● मुद्रक - **मनोहर प्रभुदास मोहोड** ● प्रकाशक - **संदीप ओंकारआप्पा पिंपळकर** ● मालक - **संदीप ओंकारआप्पा पिंपळकर** ● मुद्रण स्थळ - **श्री महाविर प्रिंटर्स** जुने अकोट मोटर स्टॅन्ड, माणेक टॉकीजच्या मागे, **अकोला** ता. जि. अकोला ४४४००५ (महाराष्ट्र) ● प्रकाशन स्थळ - **कार्यालय साप्ताहिक पहाटवारा,** व्दारा आदित्य कॉम्प्युटर, विठ्ठलवाडी जवळ, वाशीम जि.वाशीम ४४४५०५ (महाराष्ट्र) ● **संपादक – संदीप ओंकारआप्पा पिंपळकर (सर्व वाद वाशिम न्यायालया अंतर्गत)** प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# मुलींच्या अल्पसंख्यांक वसतिगृहाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

वाशिम,दि.२० नोव्हेंबर (जिमाका) शहरातील सिव्हिल लाईन परिसरात असलेल्या अल्पसंख्यांक मुलींच्या वसतिगृहाच्या शैक्षणिक वर्ष २०२५ह्न२६ च्या प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला असून, इच्छुक विद्यार्थिनींकडून अर्ज संबंधित महाविद्यालयामार्फत मागविण्यात येत आहेत. वसतिगृहातील ७० टक्के जागा अल्पसंख्यांक समाजातील मुलींसाठी राखीव राहणार असून उर्वरित ३० टक्के जागा बिगर-अल्पसंख्यांक विद्यार्थिनींसाठी असतील. आरक्षित ७० टक्के जागांसाठी पुरेसे अर्ज न मिळाल्यास, उर्वरित जागा बिगर-अल्पसंख्यांक विद्यार्थिनींना दिल्या जाणार आहेत. मागील सत्रात वसतिगृहात राहिलेल्या विद्यार्थिनींना नियमानुसार प्राधान्य देण्यात येईल. तसेच प्रवेश बारावीतील गुणांच्या टक्केवारीनुसार दिला जाणार आहे. शुल्क संरचना: इतर संवर्गातील विद्यार्थिनींसाठी प्रत्येक सत्राचे शुल्क २ हजार ८५० इतके आहे. अल्पसंख्याक कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असल्यास, संबंधित विद्यार्थिनींसाठी शुल्क माफी लागू राहील. इच्छुक विद्यार्थिनींनी प्राचार्यमार्फत अर्ज व आवश्यक कागदपत्रे दि.८ डिसेंबर पर्यंत सादर करावीत. प्रवेश प्रक्रिया१० डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता पार पडणार असून, सर्व विद्यार्थिनी व पालकांनी वेळेवर वसतिगृहात उपस्थित राहावे, असे प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन वाशिम यांनी आवाहन केले आहे. वसतिगृहाचा पत्ता: अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह, दूरदर्शन केंद्राच्या बाजूला, सिव्हिल लाईन, वाशिम.

■ भारतीयांसाठी अत्यंत अभिमानाचा, अपूर्व क्षण

# युनेस्को मुख्यालयात संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण

**मुंबई, दि. २६:- महाराष्ट्र शासनाने युनेस्कोच्या मुख्यालयाला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा भेट म्हणून दिला होता. या पुतळ्याचे अनावरण करण्यात आल्याने युनेस्कोच्या पॅरिसमधील मुख्यालय प्रांगणात संविधान दिनीच डॉ. आंबेडकर यांचा पुतळा दिमाखात उभा राहिला.**

'हा क्षण तमाम भारतीयांसाठी अभिमानाचा असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युनेस्कोशी संबंधित सर्व पदाधिकारी, वरिष्ठाधिकारी यांचे आभार मानले आहेत. ते म्हणतात, 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विद्वत्तेने आणि प्रतिभेने जगाला समता-बंधुता आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा दिली. भारताला मिळालेले संविधान हे त्यांच्या उत्तुंग अशा कर्तृत्वाचा अविष्कार आहे. अशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे संविधान दिनीच अनावरण हे जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राला मिळालेल्या संविधानप्रती व्यक्त झालेला परमोच्च आदराचा क्षण आहे. आम्ही हा क्षण महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती अभिवादनाची संधी मानतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि हा पुतळा उभा रहावा, यासाठी प्रयत्नशील अशा सर्वांचे अभिनंदनही करतो.




यानिमित्ताने सर्व नागरिकांना शुभेच्छा देतो, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. युनेस्कोच्या मुख्यालयात युनेस्कोचे महासंचालक खालिद अल-इनाय यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले. याप्रसंगी भारताचे युनेस्कोतील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाने यापूर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील घर खरेदी आणि त्याचे संग्रहालयात रूपांतरण केले आहे. जपानमधील कोयासान विद्यापीठातही डॉ. बाबासाहेबांचा पुतळा उभा राहिला आहे. आता मुंबईतील इंदूमिल येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या कामालाही वेग दिला आहे, याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी वेळोवेळी निर्देश दिले आहेत.

# निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेवर यंत्रणांनी अत्याधिक भर द्यावा - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

■ जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष कामगीरीचा आढावा

वाशिम, दि. २५ नोव्हेंबर (जिमाका) निवडणुकीच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखणे ही प्रशासनाची सर्वात मोठी जबाबदारी असून, निवडणूक शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यासाठी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन सर्व विभागांनी गांभीर्यपूर्वक नियोजनपूर्वक कामकाज करावे. कायदा व सुव्यवस्थेवर यंत्रणांनी अत्याधिक भर द्यावा असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

नगरपालिका / नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ निवडणूक तयारीच्या अनुषंगाने प्रत्यक्ष कामकाजाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली आज दि.२५ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली.यावेळी ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, नगरपालिका प्रशासन सहआयुक्त बाबुराव बिक्कड उपस्थित होते.तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार व सर्व मुख्याधिकारी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते.




बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी कुंभेजकर म्हणाले की, मतदान केंद्रांच्या १०० मीटर परिसरात बॅरेकेटींग करण्यात यावे.ऍन्टीसिपेट क्राऊड मॅनेजमेंट करतांना लोकेशन आयडेंटीफाय करत कायदा व सुव्यवस्थेबाबत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार झालेल्या तयारीचा मागोवा त्यांनी घेतला.तसेच आवश्यक सुचनांची तात्काळ कार्यवाही करावी. एसएसटी, व्हीएसटी आणि एफएसटी पथके तात्काळ कार्यान्वित करावीत आणि संबंधित अधिकारी यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी करावी असेही निर्देश दिले. जिल्हाधिकारी पुढे बोलतांना म्हणाले की, सर्व यंत्रणांनी गांभीर्याने व समन्वयाने काम करावे. मतदान केंद्रांवर अनावश्यक गर्दी होऊ नये, यासाठी आधीच आवश्यक उपाययोजना कराव्यात. ग्रामीण भागातील मोठ्या ग्रामपंचायती ओळखून संवेदनशील मतदान केंद्रांवर निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार कार्यवाही करावी.तालुकास्तरीय तक्रार निवारण केंद्र कार्यान्वित झाले असेलच, तसेच पोलिस व राज्य उत्पादन शुल्क विभागाने सजग राहून प्रतिबंधात्मक कारवाई करावी आतापर्यंत झालेल्या कारवाईचे अहवाल आचारसंहिता कक्षाकडे सादर करावेत, असेही त्यांनी निर्देश यावेळी दिले. जिपोअ अनुज तारे यांनी एसडीपीओ आणि संबंधित पोलिस यंत्रणेला पोलिंग बुथला रुटीन व्हीजीट सुरु असल्याचे सांगितले.तसेच यादृष्टीने प्रॉम्प्ट ऍक्शन सुरु असल्याचे सांगितले.जिल्ह्यात निवडणूक कालावधीत कुठेही अनुचित प्रकार घडू नयेत, यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असून कायदा व सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा निर्धार यावेळी उपस्थित यंत्रणांनी व्यक्त केला.

# शेतकरी ओळख क्रमांक निर्मितीला गती द्यावी; फार्मर आयडी अनिवार्य - जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

**वाशिम, दि. २५ नोव्हेंबर (जिमाका) शेतकरी ओळख क्रमांक हा केवळ तांत्रिक उपक्रम नसून कृषी योजनांच्या पारदर्शक, अचूक व परिणामकारक अंमलबजावणीचा मुख्य पाया आहे. शासनाने फार्मर आयडी अनिवार्य केले असून, पात्र प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत शासकीय योजनांचे लाभ अचूक पोहोचावेत, यासाठी आयडी निर्मिती ही प्राथमिक जबाबदारी आहे, असे जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी प्रतिपादन केले.**

ऍग्रीस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) निर्मितीला गती देण्यासाठी आणि उर्वरित प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली.यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी सांगितले की, जिल्ह्यातील ७८.३४ टक्के शेतकऱ्यांची ऍग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण झाली आहे. शासनाच्या ११ एप्रिल २०२५ च्या निर्णयानुसार सर्व कृषीविषयक योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य असल्याने उर्वरित पात्र शेतकऱ्यांचे आयडी तातडीने तयार करण्याची गरज अत्यंत महत्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कृषी गणनेनुसार खातेदार असूनही ज्यांचे फार्मर आयडी तयार झालेले नाहीत, त्या शेतकऱ्यांसाठी क्षेत्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले. यावेळी महसूल उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव, कृषि उपसंचालक हिना शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी आवाहन केले की, शेतकरी ओळख क्रमांकाचे महत्त्व प्रत्येक गावपातळीवर पोहोचविणे आवश्यक असून याबाबत कोणतीही ढिलाई होऊ नये. पीएम किसान लाभार्थ्यांसाठी विशेष धडक मोहीम राबवावी




प्रधानमंत्री किसान सन्मान निधी अंतर्गत लाभ घेणारे पण फार्मर आयडी नसलेले लाभार्थी ओळखण्यासाठी विशेष धडक मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आले.तलाठी लॉगिनद्वारे ऍग्रीस्टॅक पोर्टलवरील नोंद न झालेल्या लाभार्थ्यांची यादी काढून ग्रामपंचायत कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.यावेळी त्यांनी सांगितले की, एकही पात्र शेतकरी या प्रक्रियेपासून वंचित राहता कामा नये. उर्वरित पात्र प्रकरणे त्वरित निकाली काढावीत नावातील साम्य गुणांकनामुळे प्रलंबित राहिलेल्या अर्जांची तलाठी व तहसीलदारांनी नियमित आढावा घेऊन त्वरित निकाली काढणी करावी, असे स्पष्ट आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. यावेळी त्यांनी सांगितले की, प्रशासनाने प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करणे अत्यावश्यक आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार फार्मर आयडीसाठीचे फेस रिकग्निशन करण्याचा अधिकार केवळ तलाठी आणि तहसीलदार यांनाच आहे. यासंदर्भात नायब तहसीलदारांना अधिकार देण्याबाबत कोणताही प्रस्ताव कृषी आयुक्तालयाला पाठवू नये.अश्या सुचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

एकही पात्र शेतकरी योजनांपासून वंचित राहू नये, हे प्रशासनाचे धोरण आहे. म्हणून जनजागृती, तातडीची मोहीम आणि काटेकोर अंमलबजावणी या तिन्ही आघाड्यांवर काम वेगाने होणे आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकीस कृषी विभाग, महसूल विभाग तसेच तालुका पातळीवरील अधिकारी उपस्थित होते.

# एकल महिलांच्या मुलांना मिळणार दरमहा २२५० रुपयांची शिष्यवृत्ती

**शिक्षक शाळांनी पुढाकार घेण्याचे आवाहन**

**वाशिम - राज्यातील एकल महिलांच्या मुलांना शैक्षणिक आणि आर्थिक आधार मिळावा म्हणून सरकारतर्फे 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना' राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत पात्र मुलांना दरमहा २२५० रुपये शिष्यवृत्ती मिळते. राज्यातील सर्व जिल्ह्यांतून शाळामार्फत पात्र मुलांची माहिती संकलित केली जात असून, शिक्षक, शाळा आणि पालकांनी वेळेत प्रस्ताव पाठवून या मुलांना मदत मिळवून द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.**

आई किंवा वडील गमावलेल्या तसेच अनाथ, निराश्रित, बेघर आणि आपत्तीग्रस्त बालकांना संस्थेत दाखल करण्यापेक्षा त्यांच्या कुटुंबातच सुरक्षित वातावरणात संगोपन व्हावे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. महिला व बालविकास विभागाने ३० मे २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही योजना राज्यभर सुरू केली असून, ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलांना या मदतीचा लाभ मिळतो. एका कुटुंबातील दोन किंवा अधिक मुलांनाही परिस्थितीनुसार मदत दिली जाते, तर कोरोनाच्या काळात पालक गमावलेल्या बालकांसाठी मुलांची संख्या किंवा उत्पन्नाची अट लागू राहत नाही. अशा लाभार्थींना दरमहा ४ हजार रुपये दिले जातात. योजनेसाठी आधारकार्ड, शाळेचे बोनाफाईड, उत्पन्न प्रमाणपत्र, मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, बँक पासबुक, रेशन कार्ड तसेच अंगणवाडी




सेविकेसह काढलेले छायाचित्र अशी कागदपत्रे आवश्यक आहेत. संपूर्ण प्रस्ताव जिल्हा बालकल्याण समितीकडे सादर केला जातो. समिती प्रत्यक्ष सुनावणी घेऊन अर्ज मंजूर करते आणि त्यानंतर जिल्हा महिला व बालविकास कार्यालयामार्फत शिष्यवृत्तीची अंमलबजावणी केली जाते. तालुका स्तरावर मदत हवी असल्यास पंचायत समितीतील बालसंरक्षण अधिकारी, अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका किंवा एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाशी संपर्क साधता येईल. परिसरातील एक किंवा दोन पालक गमावलेल्या मुलांना या योजनेची माहिती देऊन त्यांना अर्ज प्रक्रियेसाठी मदत करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचेही कार्यकर्त्यांचे मत आहे. योजनेबाबत फॉर्म भरताना काही अडचण आल्यास साऊ एकल महिला समितीचे कार्यकर्ते मार्गदर्शन करत आहेत. वाशिम जिल्ह्यातील समन्वयक अश्विनी राम अवताडे (मो. ८७६६५९९०९६) यांच्याशी संपर्क साधता येईल. राज्यातील ८० तालुक्यांत कार्यरत असलेली साऊ एकल महिला समिती एकल महिलांच्या पुनर्वसनासाठी सातत्याने काम करत असून, इच्छुकांना या कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी (मो. ८२०८५८९१९५) यांनी केले आहे.

## महत्वाचे

### 'कोतवाल बुक' ची नक्कल आता ऑनलाइन उपलब्ध

वाशिम,दि.२८ नोव्हेंबर (जिमाका) जिल्ह्यातील नागरिकांना कोतवाल बुकची नक्कल तत्काळ व सुलभ पद्धतीने मिळावी यासाठी DigitalWashim.in डिजिटल सेवा पोर्टल विकसित करण्यात आले आहे. याद्वारे नागरिकांना कोतवाल बुकची नक्कल ऑनलाइन पद्धतीने तात्काळ उपलब्ध होणार आहे. नागरिकांनी https://digitalwashim.in या लिंकचा वापर करून ऑनलाइन अर्ज करावा व सशुल्क प्रति प्रत रु. ३०/- शुल्क भरून नक्कल प्राप्त करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. तसेच, ज्या नागरिकांची कोतवाल बुक नोंद या पोर्टलवर उपलब्ध नसेल, त्यांनी संबंधित तहसील कार्यालयातील अभिलेख कक्षात प्रत्यक्ष भेट देऊन नोंद मिळवावी.

### नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी १ डिसेंबरला रात्री १० पर्यंत प्रचाराची मुदत

वाशिम, दि. २८ नोव्हेंबर (जिमाका) नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होत असून, त्यासाठीच्या जाहीर प्रचाराची मुदत 'महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५' मधील तरतुदीनुसार १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० पर्यंत असेल.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांस संबंधित कायद्यांमधील तरतुदींनुसार घेतल्या जातात. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसदर्भातील कायद्यात जाहीर प्रचाराचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार मतदान सुरू होण्याच्या अगोदरच्या दिवशी म्हणजे १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजल्यापासून प्रचार पूर्णपणे बंद होईल. त्यानंतर प्रचारसभा, मोर्चे आणि ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. त्याचबरोबर निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरातींची प्रसिद्धी किंवा प्रसारण करता येणार नाही.असे राज्य निवडणूक आयोगाने कळविले आहे.

### फ्लॅश टँकमध्ये मतदार ओळखपत्र सापडल्यासंदर्भात माहिती देण्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांचे आवाहन

मुंबई, दि. २६ : मुंबई उपनगर जिल्हयातील अंधेरी भागात टॉयलेट फ्लॅश टँकमध्ये निवडणूक मतदार ओळखपत्र सापडल्याबाबत काही मुद्रित व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांत वृत्त व व्हिडीओ क्लिप प्रसारित झाली आहे. प्रसारित व्हिडीओ क्लिपमधून कोणताही बोध होत नाही. हे वृत्त सोशल मिडिया येथून घेऊन प्रसारित करण्यात आले असल्याचा खुलासा संबंधीत माध्यमांनी केला आहे. त्याची चौकशी केली असता घटना कुठे घडली हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे ही बातमी व व्हिडीओ क्लिपच्या अनुषंगाने २० नोव्हेंबर. २०२५ रोजी डी. एन. नगर पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबर अहवाल (ऋ्रढ-१२१८/२०२५) अज्ञाताविरुद्ध दाखल करण्यात आला आहे. तरी देखील या वृत्तातील क्लिपबाबत जर कोणत्याही नागरिकांस माहिती असेल तर त्यांनी निदर्शनास आणून द्यावी. त्याची संपूर्ण चौकशी करण्यात येईल, असे मुंबई उपनगर जिल्ह्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी कळविले आहे.

# वाशीमचा गोधा परिवार ३ डिसेंबरला झळकणार 'कौन बनेगा करोडपती'मध्ये

**वाशीम - आठवड्यातील सोमवार ते शुक्रवारला छोट्या पडद्यावर प्रसारीत होत असलेल्या प्रसारीत होत असलेला प्रश्नोत्तर मालीकांचा शो 'कौन बनेगा करोडपती' मध्ये वाशीम येथील सुप्रसिद्ध उद्योजक जितेंद्र गोधा आणि गोधा परिवाराला प्रेक्षक म्हणून उपस्थित राहण्याची संधी मिळाली आहे. हा शो बुधवार, ३ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजता सोनी वाहीनीवर प्रसारीत होत असून या शोमध्ये महानायक अमिताभ बच्चन यांच्याशी संवाद साधण्याची संधी येथील जितेंद्र गोधा, साक्षी गोधा, डॉ. युती गोधा व स्वयंम गोधा यांना मिळाला आहे.**

जितेंद्र गोधा हे वाशिम शहरातील प्रसिद्ध उद्योजक आणि सर्व समाजात वावरणारे मनमिळावू व्यक्तीमत्व आहेत. तर साक्षी गोधा ह्या गृहीणी आहेत. डॉ. युती गोधा ह्या वैद्यकीय क्षेत्रात असून स्वयंम गोधा बीबीए चे शिक्षण अर्जित करत आहेत. या शो ची शुटींग २७ नोव्हेंबरला गोरेगाव फिल्मसिटी येथे प्राईम फोकस स्टुडीओमध्ये करण्यात आली. शो मध्ये प्रेक्षक म्हणून सहभाग घेतल्याचे अनुभव सांगतांना जितेंद्र गोधा सांगतात की, महानायक अमिताभ बच्चन यांना समोरासमोर पाहण्याचा आणि त्यांच्याशी बोलण्याचा अनुभव हा स्वर्गातीत होता. अमिताभ बच्चन यांनी अत्यंत साधेपणाने



आणि शुध्द हिंदीमध्ये आमच्याशी संवाद साधला आणि आमच्या परिवाराची, तब्येतीची आपुलकीने विचारपूस केली. त्यांच्याबद्दल बोलतांना ते खुप मोठे स्टार आहेत असे वाटलेच नाही. अतिशय सामान्य माणूस या शैलीतून त्यांनी उपस्थितांशी संवाद साधून त्यांनी सर्वांचे मन जिंकुन घेतले. अमिताभ यांच्यासोबत आम्ही बसलो आहोत आणि प्रत्यक्ष समोरासमोर बोलत आहोत हा अनुभव मनाला सुखावणारा होता. त्यांच्याशी संवाद साधल्यानंतर अमिताभ हे केवळ महानायक नाहीत तर एक चांगले नागरिक सुध्दा आहेत याचा प्रत्यय आम्हाला आल्याचे जितेंद्र गोधा यांनी सांगितले.

## नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या मतदानाच्या दिवशी प्रचाराच्या जाहिरातींना बंदी

**■ १ डिसेंबरला रात्री १० वाजता प्रचाराची समाप्ती**

**वाशिम (जिमाका) नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठीच्या जाहीर प्रचाराची समाप्ती १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजता होणार असून, त्यानंतर प्रचाराच्या कुठल्याच जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाहीत.**

त्यामुळे मतदानाच्या दिवशी म्हणजे २ डिसेंबर २०२५ रोजी मुद्रित माध्यमांतदेखील जाहिराती प्रसिद्ध करू नयेत, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होत असून, त्यासाठीच्या जाहीर प्रचाराची मुदत 'महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५' मधील तरतुदीनुसार १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजता संपेल. त्यानंतर प्रचारसभा, प्रचारफेऱ्या, ध्वनिक्षेपक इत्यादींसह अन्य प्रकारे जाहीर प्रचार करता येणार नाही. राज्य निवडणूक आयोगाने ९ ऑक्टोबर २०२५ रोजी 'निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५' प्रसिद्ध केला आहे. या आदेशाच्या भाग आठमधील परिच्छेद १६ अन्वये नगरपरिषद व नगरपंचायतींसाठीच्या प्रचार समाप्तीनंतर आणि मतदानाच्या दिवशी म्हणजे २ डिसेंबर २०२५ रोजी मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे किंवा समाज माध्यमांमध्ये कुठल्याच प्रकारच्या जाहिराती प्रसिद्ध अथवा प्रसारित करता येणार नाहीत, असे राज्य निवडणूक आयोगाच्या प्रसिध्दिपत्रकात नमूद केले आहे.

# मतदानासाठी 'व्होटर आयडी'सह बारा ओळखपत्र ग्राह्य

**वाशिम (जिमाका) नगरपरिषद/पंचायत सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांची ओळख पटविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदान ओळखपत्र (व्होटर आयडी) व्यतिरिक्त १२ प्रकारची ओळखपत्रे ग्राह्य धरली असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. त्यामुळे मतदानाच्या दिवशी मतदारांना ओळख पटविण्यात कोणतीही अडचण येणार नाही आणि ते सहज मतदानाचा हक्क बजावू शकतील.**

मतदान केंद्रावर मतदारांची ओळख मतदान अधिकाऱ्याने खातरजमा करणे बंधनकारक आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या दि. १४ जुलै २०२५ रोजीच्या आदेशान्वये खालील १२ कागदपत्रांचा ओळखपुरावा म्हणून वापर करता येणार आहे :

मतदानासाठी मान्य ओळखपत्रांची सूची १. भारताचा पासपोर्ट २. आधार ओळखपत्र ३. वाहन चालविण्याचा परवाना ४. पॅन कार्ड ह आयकर विभागाकडील ओळखपत्र ५. केंद्र/राज्य शासन, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी दिलेले कर्मचारी ओळखपत्र (फोटोसहित) ६. राष्ट्रीयकृत बँक / पोस्ट ऑफिस खातेदाराचे फोटो असलेले पासबुक ७. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला फोटोसहित अपंगत्वाचा दाखला ८. मनरेगा (नरेगा) जॉब कार्ड ह फोटोसहित ९. निवृत्त कर्मचारी किंवा त्यांच्या विधवा/अवलंबित व्यक्ती यांचे फोटो असलेले पेंशन संबंधित कागदपत्रे १०. लोकसभा / राज्यसभा / विधानसभा / विधानपरिषद सदस्य ओळखपत्र ११. स्वातंत्र्य सैनिकांचे फोटोसहित ओळखपत्र १२. केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेले ईएसआय (आरोग्य विमा) फोटोसहित कार्ड

मतदारांसाठी सूचना : मतदानाच्या दिवशी अधिकृत ओळखपत्रांपैकी कोणतेही एक ओळखपत्र सोबत ठेवावे.

अनधिकृत चिठ्ठी, ओळखपत्राची साधी झेरॉक्स किंवा ओळख नसलेली कागदपत्रे मान्य केली जाणार नाहीत. मतदानादरम्यान ओळख संबंधी तांत्रिक अडचणी येऊ नयेत यासाठी प्रशासनाने आवश्यक तयारी केली आहे. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, मतदानाचा हक्क बजावताना आवश्यक ओळखपत्र अवश्य सोबत आणावे..